# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.08.2026** **वारःसोमवार**

---

1. देशभरात हर घर तिरंगा अभियानाला प्रारंभ
2. ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त देशभरात हुतात्म्यांना अभिवादन
3. बिगर जीवाश्म इंधनावर आधारित वीजनिर्मितीत भारतानं गाठला 300 गिगावॉटचा टप्पा
4. झारखंडमध्ये भरती परीक्षांमधील गैरव्यवहाराविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांची आज 'विधानसभेवर मोर्चा'ची हाक आणि
5. आशियाई कनिष्ठ गटाच्या भारोत्तोलन स्पर्धेत महाराजन अरुमुगपंडियन याला रौप्यपदक.

**<u>हर घर तिरंगा</u>**

देशभरात काल मोठ्या उत्साहात 'हर घर तिरंगा' मोहिमेला सुरुवात झाली. हरघर तिरंगा अभियान येत्या 17 तारखेपर्यंत चालणार असून, नागरिकांना आपल्या घरी तिरंगा फडकवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना 'हर घर तिरंगा' मोहिमेत उत्साहानं सहभागी होण्याचं आणि 'विकसित भारत' घडवण्याच्या कार्यात योगदान देण्याचा सामूहिक संकल्प पुन्हा दृढ करण्याचं आवाहन केलं आहे.

'हर घर तिरंगा' अभियानाअंतर्गत मुंबईतील लोकभवनात राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. महाराष्ट्रात विविध ठिकाणी काल तिरंगा यात्रा काढण्यात आली. नागपूरमध्ये आयोजित तिरंगा यात्रेमध्ये 700 फुटांचा भव्य तिरंगा ध्वज विशेष आकर्षण ठरलं. बीडमध्येही जिल्हा क्रीडा संकुलातून काल तिरंगा रॅली काढण्यात आली.

**<u>क्रांतीदिन</u>**

ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त काल देशभरात स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहिली.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी काल अंदमान आणि निकोबार बेटांवरून हर घर तिरंगा मोहिमेचा प्रारंभ केला. या बेटांच्या दौऱ्यादरम्यान 'नेताजी सुभाषचंद्र बोस बेटा'वरील अनेक ऐतिहासिक स्थळांना भेट दिली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुद्दुचेरी इथल्या मुरुगा थिएटर सिग्नलजवळ हर घर तिरंगा यात्रेला हिरवा झेंडा दाखवला.

**<u>महा-रक्तदान</u>**

ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त काल केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते नवी दिल्लीच्या बेस कँप रुग्णालयात सिंदूर महा रक्तदान शिबिराचं उद्घाटन झालं. महाराष्ट्रातल्या अनेक कुस्तीगीर आणि इतर खेळाडूंनी या शिबिरात रक्तदान केलं.

राज्यात इतर ठिकाणीही क्रांतीदिनानिमित्त वृक्षारोपण, हुतात्म्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान, सांस्कृतिक कार्यक्रम अशा अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. ज्यांच्या जिद्दीने आणि धैर्यामुळे भारत छोडो आंदोलन आणि भारताच्या स्वांतत्र्यलढ्याचा मार्ग बळकट केला, त्या असंख्य स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑगस्ट क्रांती दिनी हुतात्म्यांना आदरांजली वाहिली.

**इंधन**

बिगर जीवाश्म इंधनावर आधारित वीजनिर्मिती क्षमतेत, जुलै अखेर भारतानं 300 गिगावॅटचा टप्पा ओलांडला आहे. 2030 सालासाठी निश्चित 500 गिगावॅट क्षमतेचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे; त्यापैकी 60 टक्क्यांहून अधिक क्षमतेचा टप्पा गाठण्यात भारताला यश आलं आहे असं नव आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयानं म्हटलं आहे.  या वाढीत सौर उर्जेचा मोठा वाटा आहे. 2025-26 या काळात देशात जीवाश्म-इंधनावर आधारित नसलेल्या वीज निर्मिती क्षमतेत विक्रमी 55 पूर्णांक 29 गिगावॅटची भर पडली; यामध्ये सौर ऊर्जेचा 44 पूर्णांक 6 दशांश गिगावॅट आणि पवन ऊर्जेचा 6 गिगावॅट इतका मुख्य  वाटा होता.

**आदिवासीदिन-प्रादेशिक**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त देशभरात तसंच राज्यात काल विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. नागपूरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आदिवासी समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्र आले होते. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, तसंच जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात, नंदूरबार, धुळे, गडचिरोली जिल्ह्यातले आदिवासी बांधव सहभागी झाले होते.

**झारखंड-आंदोलन**

झारखंडमधील भरती परीक्षांमधील कथित अनियमिततेविरुद्ध दोन आठवड्यांहून अधिक काळापासून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आज 'विधानसभा मोर्चा'ची हाक दिली आहे. या पार्श्वभूमीवर, झारखंड पोलिसांनी विधानसभा परिसराभोवती प्रतिबंधात्मक आदेश लागू केले असून रांचीमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. दरम्यान, JPSC आणि JSSC परीक्षांमधील कथित अनियमिततेविरुद्ध आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बहुतांश मागण्यांवर झारखंड सरकारनं सहमती दर्शवली आहे. 14 वी JPSCप्राथमिक परीक्षा आणि 2023-25 मधील बॅकलॉग परीक्षा रद्द करण्यास सरकारनं मान्यता दिली आहे, तसंच जलदगती न्यायालय स्थापन करण्यासही सरकारनं सहमती दर्शवली असल्याचं राज्याचे मंत्री सुदिव्य कुमार सोनू यांनी काल सांगितलं.

**पंतप्रधान-खेळाडूभेट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदकविजेत्या भारतीय खेळाडूंशी संवाद साधला. यावेळी त्यांनी खेळाडूंचं अभिनंदन करत त्यांनी देशासाठी मिळवलेल्या यशाचं कौतुक केलं.
यावेळी युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविय तसंच युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे उपस्थित होते.

'जो खेलेगा, वो खिलेगा' हा संदेश देत पंतप्रधानांनी खेळ आणि युवा शक्तीचं महत्त्व अधोरेखित केलं. पंतप्रधानांनी या संवादासंदर्भातील व्हिडिओ संदेशही समाजमाध्यमावरून सामायिक केला आहे.

स्कॉटलंडमधील ग्लासगो इथं येथे 23 जुलै ते 2 ऑगस्ट या कालावधीत झालेल्या या स्पर्धांमध्ये विविध क्रीडा प्रकारांमध्ये, भारतीय खेळाडूंनी 13 सुवर्ण, 17 रौप्य आणि नऊ कांस्य पदकांसह एकंदर 39 पदकांची कमाई केली आणि भारतानं पदक तालिकेत चौथ स्थान मिळवलं.

**रशिया-भारत-रेल्वे**

धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या समुद्री मार्गांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी रशियानं हिंदी महासागर आणि भारतापर्यंत रेल्वे मार्ग विकसित करण्याचा  प्रस्ताव मांडला आहे. रशियाच्या सरकारी वृत्तसंस्थेनुसार तुर्कमेनिस्तान, इराण आणि अफगाणिस्तानमधून हा रेल्वे मार्ग काढता येऊ शकेल असं खुसनुलिन  यांनी नमूद केलं आहे.  या पर्यायी मार्गांमुळे 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' आणि 'बॉस्फोरसची सामुद्रधुनी' यांसारख्या दोन महत्त्वाच्या समुद्री मार्गांशी संबंधित समस्या हाताळण्यास मदत होऊ शकेल असं खुसनुलिन यांनी म्हटलं आहे.

**इस्राइल-हमास**

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची गाझासाठीची 15-कलमी योजना फेटाळली आहे. जोपर्यंत हमास खऱ्या अर्थानं शस्त्रे टाकत नाही, तोपर्यंत इस्रायल आपले सैन्य मागे घेणार नाही आणि इस्रायली सैन्य आणि नागरिकांना असलेल्या धोक्यांविरुद्ध कारवाई सुरूच ठेवेल असं पंतप्रधान नेतान्याहू यांनी काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगितलं. पुढील वाटचाल कशी करावी याबाबत इस्रायल आणि अमेरिका दरम्यान चर्चा सुरू आहे. हमासचं संपूर्ण निःशस्त्रीकरण करण्याच्या उद्देशानं एक

करार झाला आहे असं अध्यक्ष ट्रम्प यांच्या 'बोर्ड ऑफ पीस'नं गेल्या महिन्यात म्हटलं होतं. परंतु इस्राइलनं आपले हल्ले पूर्णपणे थांबवले आणि गाझामधील सैन्य माघारी घेतलं तरच हमास शस्त्रे टाकेल असं हमासनं म्हटलं आहे.

**भारोत्तोलन-स्पर्धा**

उझबेकिस्तानमधील ताश्कंद इथं सुरू असलेल्या आशियाई कनिष्ठ गटाच्या भारोत्तोलन स्पर्धेत भारताच्या महाराजन अरुमुगापांडियननं काल  पुरुषांच्या 65 किलो वजनी गटात रौप्य पदक मिळवलं. महाराजन नं 'स्नॅच' प्रकारात 128 किलो आणि 'क्लीन अँड जर्क' प्रकारात 157 किलो वजन उचलून एकंदर 285 किलोची कामगिरी नोंदवली. ही त्याची आतापर्यंतची सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी आहे. व्हिएतनामच्या होआंग थाच याने 291 किलो वजन उचलून सुवर्ण पदक पटकावलं.

**ॲथलेटिक्स U20 विश्वकरंडक**

अमेरिकेतील ओरेगॉन मधील युजीन, इथं सुरू असलेल्या 'ॲथलेटिक्स U20 विश्वकरंडक स्पर्धा 2026 मध्ये, बसंत कुमार मेघवाल यानं पुरुषांच्या उंच उडीत रौप्य आणि शाहनवाज खान यांनी लांब उडी प्रकारात कांस्य पदकं जिंकून इतिहास घडवला आहे. शुक्रवारी भालाफेकीत आशिष यादवने जिंकलेल्या रौप्य पदकानंतर मिळालेल्या  या  दोन पदकांमुळे युजीन इथल्या स्पर्धेत भारताच्या पदकांची एकंदर संख्या तीन झाली आहे. भारतानं आता 2021 आणि 2022 च्या आवृत्त्यांमधील आपल्या पदकांच्या संख्येची बरोबरी केली आहे.

**बॅडमिंटन**

भारताची बॅडमिंटनपटू अश्मिता चालिहा हिनं कोरिया मास्टर्स 2026 चं विजेतेपद पटकावलं आहे.  काल झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात तिनं चीनच्या हान क्विआन शी हिच्यावर 14-21, 21-14, 21-14 अशी मात केली आणि कारकीर्दीतलं पहिलं बीडब्ल्यूएफ जेतेपद पटकावलं.

**फिबा**

अहमदाबादमध्ये येत्या 13 ते 23 ऑगस्ट दरम्यान 18 वर्षांखालील आशिया बास्केटबॉल चषक' स्पर्धा म्हणजे फिबा आयोजित केली जाणार आहे. भारताचा पहिला सामना 14 ऑगस्ट रोजी जपानविरुद्धच्या होणार आहे. गट फेरीमध्ये भारतीय संघाचा सामना कोरिया, जपान आणि कझाकस्तान यांच्याशी होईल.

**हवामान**

हवामान विभागानं आज पूर्व राजस्थान, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि मध्य प्रदेशातील पश्चिमेकडील भागात  मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसंच, आज आणि उद्या दिल्ली, हरियाणा, चंदीगड, आसाम, मेघालय, पूर्व मध्य प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. पंजाब, बिहार, ओडिशा, उत्तर प्रदेश, विदर्भ, छत्तीसगड, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्येही आज मुसळधार पावसाची शक्यता आहे.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.